THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 24TH SEPTEMBER 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख ९ माहे आगस्ट सन १८९६.

नंबर ६१२३.—पिट्रोलियम आक्ट नामक सन १८८६ चा आक्ट १२, कलम १, पोटकलम (३), यांत दिलेले अधिकार चालवून, आलीजाह् गव्हर्नर इन् कौन्सिल यांजकडून असें फर्माविण्यांत येतें कीं, भयकारक पिट्रोलियमसंबंधाचे व पिट्रोलियम आणण्या[आयात करण्या]संबंधाचे सदरहू आक्टांतील ठराव खेरीज करून इतर सर्व ठराव, सन १८९६ च्या सप्टेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेरोजीं व त्या तारखेनंतर खालीं सांगितलेल्या प्रदेशांस लागू होतील. ते प्रदेश येणेंप्रमाणें:—

(१) (अ) पुण्याची सबर्बन म्युनिसिपालिटी,

(ब) भडोच शहर म्युनिसिपालिटी,

(क) अमदाबाद शहर म्युनिसिपालिटी,

(ड) सुरत शहर म्युनिसिपालिटी,

हे म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट;

(२) खानदेश जिल्ह्यांतील भुसावळ तालुका; आणि

(३) मुंबई शहराच्या व सदरीं सांगितलेल्या प्रदेशांपैकीं कोणत्याही प्रदेशाच्या दर्म्यानची जी जमीन:

(अ) जी. आय्. पी. रेलवेच्या किंवा

(ब) बी. बी. अॅण्ड सी. आय्. रेलवेच्या

कारणांकरितां अशा रेलवेच्या भोगवट्यांत असेल किंवा अशा रेलवेकरितां घेतलेली असेल ती सर्व जमीनः या जमिनींत, अशा रेलवेकडे असणाऱ्या जमिनीच्या सीमा दर्शविणारीं कुडणें किंवा इतर हद्दीच्या खुणा यांच्या आंतील सर्व जमीन, आणि अशा रेलवेच्या कारणांकरितां किंवा संबंधानें चालू असणाऱ्या रेलींच्या सर्व लैनी, सायडिंगें व शाखा, यांचाच नव्हे, तर अशा रेलवेच्या कारणांकरितां किंवा संबंधानें उपयोगांत असलेलीं किंवा उपयोगांत येण्यासारखीं असतील तीं सर्व स्टेशनें, कचेऱ्या, वेरहौसें, वर्कशॉप, कारखाने, कंपौंडें, अवारें [यार्ड], रस्ते, खुल्या जागा व इतर जमिनी मग त्यांवर इमारती असोत किंवा नसोत, यांचाही समावेश होतो.

नंबर ६१२३ अ.—पिट्रोलियम आक्ट नामक सन १८८६ चा आक्ट १२ यांतील भयकारक पिट्रोलियमसंबंधाचे व पिट्रोलियम आणणें यासंबंधाचे ठराव खेरीज करून इतर ठराव, रकान्यांत* लिहिलेल्या प्रदेशांस, जाहिरनामा नंबर ६१२३, तारीख९ माहे आगस्ट सन १८९६ यावरून लागू केले आहेत त्या प्रदेशांस लागू करावयाच्या ज्या कानू, त्यांस आली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी घेऊन, सदरहू आक्टाच्या १? व्या कलमाअन्वयें करण्याचें योजिलें आहे त्यांचा खालीं दिलेला मसुदा, त्याचा संबंध पोहंचण्यासारखा असेल अशा मनुष्यांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केला आहे, आणि यावरून असें जाहीर करण्यांत येतें कीं या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिना झाल्यानंतर त्या मसुद्याचा विचार करण्यांत येईल :—

*(१) (अ) पुण्याची सबर्बन म्युनिसिपालिटी,

(ब) भडोच शहर म्युनिसिपालिटी,

(क) अमदाबाद शहर म्युनिसिपालिटी,

(ड) सुरत शहर म्युनिसिपालिटी,

हे म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट ;

(२) खानदेश जिल्ह्यांतील भुसावळ तालुका ; आणि

(३) मुंबई शहराच्या व सदरीं सांगितलेल्या प्रदेशांपैकीं कोणत्याही प्रदेशाच्या दर्म्यानची जी जमीन

(अ) जी. आय्. पी. रेलवेच्या किंवा

(ब) बी. बी. ॲण्ड सी. आय्. रेलवेच्या

कारणांकरितां अशा रेलवेच्या भोगवट्यांत असेल किंवा अशा रेलवेकरितां घेतलेली असेल ती सर्व जमीन: या जमिनींत, अशा रेलवेकडे असणाऱ्या जमिनीच्या सीमा दर्शविणारीं कुडणें किंवा इतर हद्दीच्या खुणा यांच्या आंतील सर्व जमीन, आणि अशा रेलवेच्या कारणांकरितां किंवा संबंधानें चालू असणाऱ्या रेलींच्या सर्व लैनी, सायडिंगें व शाखा, यांचाच नव्हे, तर अशा रेलवेच्या कारणांकरितां किंवा संबंधानें उपयोगांत असलेलीं किंवा उपयोगांत येण्यासारखीं असतील तीं सर्व स्टेशनें, कचेऱ्या, वेरहौसें, वर्कशॉप, कारखाने, कंपौंडें, अवारें [यार्ड], रस्ते, खुल्या जागा व इतर जमिनी मग त्यांवर इमारती असोत किंवा नसोत, यांचाही समावेश होतो.

पिट्रोलियम आक्ट नामक सन १८८६ चा आक्ट १२, ह्याच्या ११ व्या कलमामध्यें दिलेले अधिकार चालवून मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी आणवून, मुंबई इलाक्यांत पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याचे अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचे परवाने देण्याचें नियमन करण्याकरितां खालीं लिहिलेल्या कानू केल्या आहेत:

## प्रथमारंभींचे ठराव.

अर्थ.

१. ह्या कानूंमध्यें,—

"सदर्हू आक्ट".

(१) "सदर्हू आक्ट" ह्मणजे सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट असें समजावें:

"मुंबई शहर".

(२) "मुंबई शहर" ह्यांत, मुंबई येथील न्यायाच्या हैकोर्टाच्या साधारण अवल दिवाणी अधिकाराच्या स्थलसीमांच्या आंत त्या त्या वेळीं असणाऱ्या प्रत्येक जागेचा समावेश होतो, आणि

पिट्रोलियम आक्टांत व्याख्या केलेले शब्द व संज्ञा.

(३) सदरहू आक्टांत ज्या शब्दांची आणि संज्ञांची व्याख्या केलेली आहे, त्या शब्दांचा आणि संज्ञांचा सदरहू आक्टांतल्या अर्थाप्रमाणेंच अर्थ आहे.

मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम.

"मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम" ह्मणजे ३०० ग्यालनांच्या किंवा त्यापेक्षां मोठ्या कोणत्याही पात्रांत असलेलें पिट्रोलियम असें समजावें.

स्थानिक व्याप्ति.

२. ह्या कानू जेथवर भयकारक पिट्रोलियमास लागू आहेत, तेथवर त्या सगळ्या मुंबई इलाक्यास लागू होतील, आणि जेथवर त्या इतर पिट्रोलियमास लागू आहेत तेथवर त्या, सदर्हू आक्टाचें कलम १, पोटकलम (३), याअन्वयें गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या जाहिरनाम्यानें बाकीचा सदरहू आक्ट ज्या स्थानिक प्रदेशांस त्या त्या वेळीं लागू केला असेल त्यांस मात्र लागू होतील.

## पिट्रोलियम कबज्यांत ठेवणें.

३. परिमाणानें पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त पिट्रोलियम ठेवण्याबद्दलचे अगर भयकारक पिट्रोलियम ठेवण्याबद्दलचे परवाने फक्त, तें पिट्रोलियम सांठविण्यासाठीं ज्या जागेचा उपयोग करण्याचा इरादा असेल ती जागा आणि तिच्या कोणत्याही बाजूस असणारी दुसरी कोणतीही इमारत ह्यांच्या दरम्यान निदान वीस फूट अगदी मोकळी उघडी जागा असेल तेव्हां, आणि त्या जागेसंबंधानें खालील अटीही पुऱ्या केलेल्या असतील तेव्हां मात्र सामान्यतः देण्यांत येतील. त्या अटी येणेंप्रमाणें:— ज्या जागेंत पिट्रोलियम सांठवायाचें असेल, त्या जागेच्या संबंधानें कित्येक अटी पुऱ्या केलेल्या असल्याशिवाय पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याचे परवानें देऊं नयेत.

(अ) मुंबई शहरांत, ज्या इमारतींत सदरहू पिट्रोलियम सांठवावयाचें असेल, ती इमारत चिरेबंदी अगर विटबंदी असून गच्चीच्या अगर लोखंडाच्या छपराची असली पाहिजे, आणि तिच्या जमिनी विटांनीं अगर दगडांनीं फरसबंदी केलेल्या अगर मातीच्या असल्या पाहिजेत, आणि आगीच्या प्रसंगीं पिट्रोलियम त्या इमारतीच्या बाहेर वाहूं नये ह्मणून तिचीं दारें व द्वारें रस्त्याच्या किंवा गल्लीच्या सपाटीच्या निदान दोन फूट वर बांधिलेलीं असलीं पाहिजेत किंवा त्या इमारतीची जमीन रस्त्याच्या किंवा गल्लीच्या सपाटीच्या निदान दोन फूट खालीं असली पाहिजे.

(ब) मुंबई शहराबाहेर, (अ) रकमेंत सांगितलेल्या अटी, अगर पुढील अटीः ह्मणजे, सदरहू पिट्रोलियन सांठविण्याची इमारत विटांची अगर मातीची बांधलेली असून दरवाजे शिवाय करून तिचा कोणताही भाग बांधण्यांत ज्वालाग्राही पदार्थांचा उपयोग केलेला नसला पाहिजे; आणि त्या इमारतीच्या भोंवतीं निदान चार फूट उंच भिंत अगर मातीचा बांध असून अशी भिंत अगर बांध व ती इमारत ह्यांच्या दरम्यान त्या इमारतीच्या अगदीं जवळ व त्या इमारतीच्या सभोंवार, आगीच्या प्रसंगीं, त्या इमारतींत सांठविलेलें सगळें पिट्रोलियम राहून तें बाहेर जाऊं नये इतका मोठा चर असला पाहिजेः

(अ) सदरहू कानूंमध्यें कोणताही ठराव असला तरी, स्थानिक सरकार, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, आणि आपण ठरवील तशा शर्तींस पात्र राहून, आपण पसंत केलेल्या प्लानांबरहुकूम आणि स्पेसिफिकेशन्सबरहुकूम मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम सांठविण्यासाठीं मुद्दाम तयार केलेल्या जागेमध्यें कोणत्याही विवक्षित परिमाणाचें पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्यासाठीं परवाना देण्यास मुखत्यार आहे. अशा जागेंतील प्रत्येक सांठवणाच्या टांक्यावर अगर इतर पात्रावर, त्यांत किती ग्यालन पिट्रोलियम मावण्याजोगें आहे तें, सहज दिसेल अशा रीतीनें, लिहिलेलें असलें पाहिजे.

(ब) मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम सांठविण्यासाठीं, मुंबई बंदराच्या ट्रस्टींमध्यें निविष्ट झालेल्या अगर त्यांनीं धारण केलेल्या जमिनीवर, त्या ट्रस्टींच्या लेखी संमतीनें आणि स्थानिक सरकारानें पसंत केलेल्या प्लानांबरहुकूम व स्पेसिफिकेशन्सबरहुकूम जें कोणतेंही टांकें अगर पात्र बांधण्यांत येईल, तें या कानूअन्वयें पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याबद्दल परवाना दिलेली जागा आहे असें समजलें पाहिजे.

(क) मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम ज्या धक्क्यांवर उतरावयाचें असेल ते धक्के, जलमार्गाच्या कस्टम्सच्या आक्टाअन्वयें, सरकारी गझे-

टांत, भयकारक नाहीं असें पिट्रोलियम उतरण्याच्या जागा ह्मणून जाहीर केले पाहिजेत.

विशेष ठराव.

मात्र इतकेंच कीं सरकार अगर सदहू परवाना देणारा अमलदार (जसें असेल त्याप्रमाणें) ह्यास, विशेष कारणांसाठीं (तो परवाना कोणा अमलदारानें दिलेला असेल तेव्हां, त्यानें तो देण्याच्या आधीं हीं कारणें लिहून ठेविलीं पाहिजेत) सदरहू अटींपैकीं कोणतीही अट अगर सर्व अटी माफ करण्याचा अखत्यार आहे.

ज्या जागेसंबंधानें पिट्रोलियम ठेवण्याचा परवाना दिलेला असेल ती जागा पाहाणीस पात्र आहे.

४. परवाना देणाऱ्या अमलदाराला, अगर हेड कान्स्टेबलच्या दर्ज्याच्या किंवा त्याहून अधिक दर्ज्याच्या कोणत्याही पोलीस अमलदाराला, ज्या कोणत्याही जागेसंबंधानें पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याचा परवाना दिलेला असेल त्या जागेंत, तिची पाहाणी करण्यासाठीं, सूर्योदय व सूर्यास्त ह्यांच्या दर्म्यान कोणत्याही वेळीं जाण्याचा अखत्यार आहे,

परवानेवाल्यांनीं तपासणीकरतां सवलती दिल्या पाहिजेत आणि, मागितले असतां, आपल्या पिट्रोलियमचे नमुने दिले पाहिजेत.

५. परवाना देणाऱ्या अमलदाराला, अगर सदरीं सांगितलेल्या कोणत्याही पोलीस-अमलदाराला, परवानेवाल्याच्या कबज्यांत असलेलें कोणतेंही पिट्रोलियम ज्या कोणत्याही पात्रांमध्यें सांठविलेलें असेल किंवा असेल, त्यांतलें कोणतेंही भांडें दाखविण्यास त्याची तपासणी करण्याच्या कामीं त्यास लागेल ती मदत देण्यास, आणि नमुना घेण्यासाठीं तो दाखवील त्या पात्रांतून तो, त्याची किंमत दिल्यावर, त्याला देण्यास परवानेवाल्यास फर्माविण्याचा अखत्यार आहे.

सदरहू रीतीनें मिळविलेल्या कोणत्याही नमुन्याच्या परीक्षेच्या संबंधानें, सदरहू आक्टाच्या १३ व्या कलमांत जें काम चालवावें ह्मणून ठरविलें आहे तें काम चालविलें पाहिजे, व ह्या कारणांसाठीं त्या परवानेवाल्यास पिट्रोलियमचा व्यापारी समजलें पाहिजे.

## पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेणें.

भयकारक पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याची मनाई आहे.

६. (१) भयकारक पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याची अगदीं मनाई आहे.

भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याकरितां विशेष परवाना जरूर आहे.

(२) कोणतेंही भयकारक पिट्रोलियम विशेष परवान्याशिवाय एका जागेहून दुसऱ्या जागीं नेतां कामा नये.

भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल साधारण व विशेष परवाने.

(३) ५०० ग्यालनपेक्षां जास्त असलेलें भयकारक नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल साधारण अगर विशेष परवाने देण्याचा अखत्यार आहे.

मोठ्या प्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल परवाने.

(४) मोठ्या प्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां, त्याबद्दल परवाने द्यावयाचे ते, तें पिट्रोलियम जर हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर सहज न फुटणाऱ्या अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें असेल, अगर चांगल्या रीतीनें बूच मारलेल्या आणि फुटण्याची भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असेल, तर मात्र देण्यांत येतील.

पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल परवाने.

(५) भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असल्यास त्याबद्दलचे परवाने खालील नियमांस अनुसरून देण्याचा अखत्यार आहे:—

(अ) तें रेलवेनें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अखत्यार आहे,—तें ज्या रेलवे आड्मिनिस्ट्रेशनाच्या लैनविरून असें न्यावयाचें असेल त्या रेलवे आड्मिनिस्ट्रेशनानें पसंत केलेल्या टांक्याच्या वागणींत अगर सहज नेतां येण्याजोग्या टांक्यांत तें भरलेलें असेल तर.

(ब) तें आगबोटींतून अगर मचव्यांतून एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अख्त्यार आहे,—ती आगबोट अगर तो मचवा त्या कामासाठीं योग्य असल्याबद्दल ह्या बाबतींत स्थानिक सरकारानें नेमिलेल्या अमलदाराकडून दाखला मिळालेला असेल तर.

(क) तें गाड्यांतून एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अख्त्यार आहे,—त्या गाड्या तें असें नेण्यासाठीं योग्य असल्याबद्दल ह्या बाबतींत स्थानिक सरकारानें नेमिलेल्या अमलदाराकडून दाखला मिळालेला असेल तर.

मात्र, तें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें ज्या टांक्यांत सांठविलेलें असेल, अगर ज्या रेलवे वागणींतून, आगबोटींतून, मचव्यांतून व गाड्यांतून नेलेलें असेल त्यांत पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेला वायू न राहूं देण्याबद्दल सरकार पसंत करील ती तजवीज केलेली असली पाहिजे. वायू काढून टाकण्याबद्दल व्यवस्था.

(६) (अ) भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें रेलवेनें, रस्त्यानें अगर जलमार्गानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दलचे, आणि मोठ्या प्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम गाड्यांतून मात्र एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दलचे बारा महिन्यांच्या मुदतीचे साधारण परवाने देण्याचा अख्त्यार आहे. अशा परवान्यांमध्यें, त्यांच्या धारणकरणारांना, खरोखर त्यांचा स्वतःचा माल असणारें कोणतेंही पिट्रोलियम, अखेर न्यावयाच्या स्थलासंबंधानें अगर परिमाणासंबंधानें निर्बंध ठेविल्याशिवाय, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा अधिकार दिलेला असेल. साधारण परवाने.

(ब) साधारण परवाना धारण करणारानें, त्या परवान्याअन्वयें न्यावयाच्या पिट्रोलियमाच्या प्रत्येक कन्सैन्मेंटाबरोबर, ह्या कानूंस जोडलेल्या ग नमुन्याबरहुकूम एक पास दिला पाहिजे; त्या पासामध्यें, तें पिट्रोलियम कोणत्या जागेपासून कोणत्या जागीं न्यावयाचें तें आणि तो पास किती पिट्रोलियमबद्दल आहे तें सांगितलेलें असलें पाहिजे. प्रत्येक पासावर नंबर असला पाहिजे, आणि साधारण परवान्याचा नंबर, पिट्रोलियम नेणाऱ्या गाडीवरील शेवटल्या पेटीच्या सहज दिसणाऱ्या अशा भागावर अगर सहज दिसेल अशा दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें सुवाच्य मांडिला पाहिजे. पास.

(७) पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचे विशेष परवाने, ते देण्याच्या तारिखेपासून साहा महिन्यांपेक्षां जास्त नाहीं अशी जी मुदत सरकार अगर ते परवाने देणारा अमलदार ठरविल त्या मुदतीपर्यंत, योग्य अधिकाऱ्याकडून ते या मुदतीच्या आंत रद्द न झाल्यास, अमलांत राहतील. विशेष परवाने कितीमुदतीपर्यंत अमलांत राहतील.

(८) पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या प्रत्येक विशेष परवान्यामध्यें, तें पिट्रोलियम कोणत्या जागेहून कोणत्या जागीं न्यावयाचें तें, तो परवाना किती पिट्रोलियमबद्दल आहे तें आणि तो परवाना किती मुदतीपर्यंत अमलांत असावयाचा तें सांगितलेलें असलें पाहिजे. आणि त्यांत काय असलें पाहिजे.

७. परवान्याअन्वयें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत येत असलेलें पिट्रोलियम, फक्त सदरील शेवटल्या कानूंत सांगितल्या रीतीनें आणि परवान्यांत निर्दिष्ट केलेल्या मार्गानें नेलें असल्याबद्दल पाहणें हें सर्व पोलीस अमलदारांचें काम आहे; आणि अशा कोणत्याही अमलदारास, वाटेनें जात असलेलें कोणतेंही पिट्रोलियम थांबवून त्याची पाहाणी करण्याचा आणि जरूर असल्यास, तें पिट्रोलियम हवालीं असलेल्या मनुष्यास ह्या कानूंप्रमाणें अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दलच्या वाटेनें जात असतां पिट्रोलियमची पाहाणी करणें पोलीसचें काम आहे.

परवान्याच्या अटींपैकीं कोणत्याही अटीप्रमाणें वागण्याविषयीं फर्माविण्याचा अख्त्यार आहे.

## परवाने देणें.

भयकारक पिट्रोलियम कवज्यांत ठेवण्याचे अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचे सदरहू आक्टाच्या ५ व्या कलमाखालीं द्यावयाचे परवाने कसे मिळविणें.

८. चाळीस ग्यालनांहून अधिक भयकारक पिट्रोलियम ठेवण्याच्या अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या लैसेन्सासाठीं सदर्हू आक्टाच्या ५ व्या कलमाअन्वयें करावयाचे अर्ज मुंबई शहरांत कमिशनर आफ् पोलीस ह्यांकडे, एडनांत रेसिडेंटाकडे आणि इतर ठिकाणीं भागाच्या कमिशनराकडे रुजू केले पाहिजेत, ह्मणजे ते अमलदार, चौकशीअंतीं ते अर्ज आपल्या अभिप्रायासहित सरकारांत रेव्हेन्यू डिपार्टमेंटाकडे पाठवितील.

असा अर्ज मंजूर करण्यांत आला तर, तो परवाना, त्यावर सरकारच्या एका सेक्रेटरीची सही होऊन, ज्या अमलदाराकडे सदरहू अर्जदाराचा अर्ज रुजू केलेला असेल त्या अमलदाराच्याद्वारें त्याकडे पाठविण्यांत येईल.

पिट्रोलियम कवज्यांत ठेवण्याचे अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेमण्याचे इतर परवाने कसे मिळविणें.

९. सदर्हू आक्टाच्या ५ व्या कलमाखालीं न येणारें पिट्रोलियम कवज्यांत ठेवण्याच्या अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या परवान्यांसाठीं करावयाचे अर्ज, यांत खालीं निर्दिष्ट केलेल्या अमलदारांकडे केले पाहिजेत: कोणकोणत्या अमलदारांनीं कोणकोणते परवाने द्यावे तेंही खालीं निर्दिष्ट केलें आहे :—

| परवान्याचा प्रकार. | ज्या जागीं परवाना मिळण्याचा अर्ज केला असेल ती जागा. | परवाना कोणीं द्यावा. |
|---|---|---|
| (१) एकाच इसमानें अगर एकाच जागीं चाळीस ग्यालन अगर चाळीस ग्यालनांपेक्षां कमी भयकारक पिट्रोलियम ठेवण्याचा परवाना.<br>(२) एकाच इसमानें अगर एकाच जागीं पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त पिट्रोलियम ठेवण्याचा परवाना. | (१) मुंबई शहर.<br>(२) एडन.<br>(३) इतर ठिकाणीं. | (१) म्युनिसिपल कमिशनर.<br>(२) रेसिडेंट.<br>(३) जिल्हा माजिस्ट्रेट अगर सरकार वेळोवेळीं मुंबई सरकारी गझेटांत जाहिरनामा देऊन ज्या कोणत्याही दुसऱ्या अमलदारास ह्यासंबंधानें मुद्दाम अधिकार देईल तो अमलदार. |
| (३) चाळीस ग्यालन अगर चाळीस ग्यालनांपेक्षां कमी भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना.<br>(४) पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना. | (१) मुंबई शहर.<br>(२) एडन.<br>(३) इतर ठिकाणीं. | (१) कमिशनर अगर डेप्युटी कमिशनर आफ् पोलीस.<br>(२) रेसिडेंट.<br>(३) जिल्हा माजिस्ट्रेट अगर सरकार सदरीं सांगितलेल्या रीतीनें ज्या कोणत्याही दुसऱ्या अमलदारास ह्यासंबंधानें मुद्दाम अधिकार देईल तो अमलदार. |

परवान्याकरितां अर्ज कसे करणें.

१०. (१) पिट्रोलियम ठेवण्याच्या अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या परवान्यांबद्दल करावयाचे अर्ज लेखी असले पाहिजेत.

(२) पिट्रोलियम ठेवण्याच्या परवान्यांकरितां केलेल्या अर्जांत खालीं निर्दिष्ट केलेला तपशील असला पाहिजे :—

(अ) अर्जदार जें पिट्रोलियम ठेवण्यास इच्छीत असेल, त्याचा प्रकार व परिमाण ;

(ब) तें पिट्रोलियम ज्या जागेंत ठेवण्याचा विचार असेल, तिचें नांव व स्थान, आणि ती जागा कानू ३ मधील अटींबरहुकूम आहे किंवा कसें तें ;

(क) अर्जदार तें पिट्रोलियम ज्या कारणासाठीं ठेवणार असेल तें कारण ;

(ड) त्या जागेंत पिट्रोलियम ठेवण्याचा एकादा परवाना आधींच मिळालेला असल्यास, तो किती पिट्रोलियमबद्दल आहे तें.

(३) पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या परवान्यांकरितां केलेल्या अर्जांत खालीं निर्दिष्ट केलेला तपशील असला पाहिजे :—

(इ) जें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, त्याचा प्रकार व परिमाण ;

(फ) तें पिट्रोलियम ज्या जागेहून ज्या जागेस न्यावयाची इच्छा असेल त्या जागांचीं नांवें ;

(ग) तें ज्या मार्गानें व ज्या साधनानें नेण्याचें योजिलें असेल, तो मार्ग व तें साधन ; आणि

(ह) एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें पिट्रोलियम ज्या पात्रांत असेल त्या पात्रांचा प्रकार.

(४) भयकारक पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याबद्दल अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल परवाने मिळण्याकरितां सदर्हू आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें करावयाच्या अर्जांमध्यें, त्या कलमाच्या (२) ऱ्या पोटकलमांत असावा ह्मणून सांगितलेला तपशीलही असला पाहिजे.

किती पिट्रोलियमबद्दल परवाना द्यावा तें.

११. सदर्हू आक्टाच्या ६ व्या अगर १० व्या कलमाखालीं केलेल्या कोणत्याही अर्जाचा निकाल करितांना, परवाना देणाऱ्या अमलदारास, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, त्यास योग्य वाटेल तितकें पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याबद्दल अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल परवाना देण्याचा अख्त्यार आहे.

परवाने किती मुदतींपर्यंत अमलांत असतील तें.

१२. पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याचा प्रत्येक परवाना, तो ज्या तारिखेस देण्यांत येईल त्या तारिखेपासून एक वर्षपर्यंत अमलांत राहील.

परवाने नवीन करून मागण्याकरितां अर्ज कसे करणें.

१३. पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याचा परवाना नवीन करून मागण्याकरितां करावयाचा प्रत्येक अर्ज, मूळ परवान्याकरितां ज्या रीतीनें अर्ज करावा लागतो, तसाच केला पाहिजे. असा प्रत्येक अर्ज, मूळ परवाना संपण्याच्या तारिखेच्या आधीं निदान पंधरा दिवस केला पाहिजे.

## परवान्यांबद्दल फी.

फी किती घ्याव्या तें.

१४. पिट्रोलियम ठेवण्याच्या अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या मूळ अगर नवीन करून दिलेल्या परवान्यांबद्दल खालीं नमूद केलेल्या फी घेतल्या जातील, ह्मणजे :

| | |
|---|---|
| (१) चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त भयकारक पिट्रोलियम ठेवण्याचा परवाना — दर चाळीस ग्यालनांबद्दल अगर चाळीस ग्यालनांच्या अंशाबद्दल... ... ... ... | रु० ९ |

| | | |
|---|---|---|
| (२) चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना — दर चाळीस ग्यालनांबद्दल अगर चाळीस ग्यालनांच्या अंशाबद्दल ... ... ... ... | ... | रु० ४ |
| (३) चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें भयकारक पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याचा परवाना ... ... | ... | ३ |
| (४) चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना | ... | २ |
| (५) पिट्रोलियम (भयकारक पिट्रोलियमखेरीज इतर) ठेवण्याचा परवाना— | | |
| (अ) सांठवून ठेवावयाचें पिट्रोलियम पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त असेल परंतु एक हजार ग्यालनांपेक्षां जास्त नसेल तेव्हां ... ... ... ... | ... | १२ |
| (ब) सांठवून ठेवावयाचें पिट्रोलियम एक हजार ग्यालनांपेक्षां जास्त असेल परंतु पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त नसेल, तेव्हां एक हजार ग्यालनांपेक्षां जास्त असलेल्या प्रत्येक हजार ग्यालनांबद्दल अगर हजार ग्यालनांच्या अंशाबद्दल जादा ... ... | ... | २ |
| (क) सांठवून ठेवावयाचें पिट्रोलियम पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त असेल, तेव्हां पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त असलेल्या दर (जादा) हजार ग्यालनांबद्दल अगर हजार ग्यालनांच्या अंशाबद्दल ... | ... | ४ |
| (६) पिट्रोलियम (भयकारक पिट्रोलियमखेरीज इतर) एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना— | | |
| तें पिट्रोलियम पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त असेल परंतु पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त नसेल तेव्हां. | .... | १ |
| दर जादा पांच हजार ग्यालनांबद्दल अगर पांच हजार ग्यालनांच्या अंशाबद्दल ... ... ... | ... | १ |
| (७) पिट्रोलियम रेलवेनें, रस्त्यानें अगर जलमार्गानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा बारा महिन्यांचा साधारण परवाना ... ... ... ... ... | ... | १०० |

### परवान्यांचे नमुने व शर्ती.

*परवान्यांचे नमुने व शर्ती परिशिष्टांत दिल्याप्रमाणें असणें.*

१५. ह्या कानूंअन्वयें द्यावयाचे परवाने, ह्या कानूंस जोडिलेल्या परिशिष्टांत सांगितलेल्या त्या त्या नमुन्याबरहुकुम असले पाहिजेत आणि त्यांमध्यें त्या त्या अटी दाखल केलेल्या असल्या पाहिजेत.

### परवाने रद्द करणें.

*सरकारास अगर परवाने देणाऱ्या अमलदारास ते केव्हां रद्द करण्याचा अखत्यार आहे.*

१६. ह्या कानूंअन्वयें दिलेला कोणताही परवाना धारण करणारानें अगर त्याच्या कोणत्याही नोकरानें त्या परवान्याच्या कोणत्याही शर्तीचा अगर ह्या कानूंतल्या अगर सदरहू आक्टांतल्या कोणत्याही ठरावाचा भंग केल्याबद्दल सरकारची अगर तो परवाना देणाऱ्या अमलदाराची अगर त्याच्या जागीं आलेल्या स्थानापन्नाची खात्री होई अशा रीतीनें शाबिती झाली, तर सरकारास अगर त्या अमलदारास तो परवाना कोणत्याही वेळीं रद्द करण्याचा अखत्यार आहे.

# परिशिष्ट.

## नमुना अ.

**भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट ( सन १८८६ चा १२ ) ह्याच्या ५ व्या अगर ६ व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.**

नंबर

फी, रुपये

ह्यावरून ह्यास ग्यालन भयकारक पिट्रोलियम ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस व शर्तीस पात्र ठेवून खालीं वर्णन केलेल्या जागीं सांठविण्यास परवाना दिला आहे.

हा परवाना त्याच्या तारिखेपासून एक वर्षपर्यंत अमलांत राहील; आणि हा नवीन करून द्यावा ह्मणून सदर्हू वर्ष संपण्यापूर्वी निदान पंधरा दिवस अर्ज करण्यांत आला ह्मणजे तो नवीन करून देण्याचा अख्त्यार आहे.

**सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—**

( सही )

सेक्रेटरी निसबत मुंबई सरकार.

पिट्रोलियम चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नसेल तेव्हां. { अगर, म्युनिसिपल कमिशनर, मुंबई. अगर, रेसिडेंट, एडन. अगर जिल्हा माजिस्ट्रेट.

---

## अ नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू.

[ येथें सदरहू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १ ते ९ ह्या ९, आणि कानू १६ ह्या दाखल कराव्या. ]

### शर्ती.

हा परवाना खालील शर्तीस पात्र ठेवून दिला आहे :—

१. हा परवाना ज्या जागेच्या संबंधानें दिला आहे, त्या जागेंत ज्वालाग्राही पदार्थ मुळींच साठवूं नयेत.

२. सदर्हू पिट्रोलियमच्या प्रत्येक पेटीवर ( अगर डबा वगैरे ह्यावर) सदर्हू आक्टाच्या ७ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें नांवाची चिठ्ठी असली पाहिजे.

३. ज्या इमारतींत सदर्हू पिट्रोलियम सांठविलेलें असेल, तिच्याआंत पिट्रोलियम भरलेलें कोणतेंही पात्र उघडूं नये आणि कोणत्याही पात्रांतून तेल काढूं नये.

४. सदर्हू इमारतीच्याआंत कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, विस्तव पेटवूं देऊं नये अगर दिवा लावूं देऊं नये.

५. सरकार किंवा हा परवाना देणारा अमलदार जर, हा परवाना ज्या जागेबद्दल दिलेला असेल त्या जागेच्या सुरक्षितपणासाठीं सरकारच्या अगर त्या अमलदाराच्या मतें जरूर असलेली कोणतीही मरामत करण्यास हा परवाना धारण करणारास लेखी नोटीस देऊन हुकूम करील, तर हा परवाना धारण करणारानें, ती नोटीस पोहंचण्याच्या तारखेपासून एका आठवड्याहून कमी नाहीं अशी जी मुदत त्या नोटिशींत नेमली असेल तिच्याआंत ती मरामत केली पाहिजे.

६. हा परवाना धारण करणारानें, ह्या परवान्यांत दाखल केलेल्या पिट्रोलियमांतून तीन ग्यालनपेक्षां जास्त पिट्रोलियम, सदर्हू आक्टाच्या ५ व्या किंवा ६ व्या कलमाअन्वयें तितकें पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्यास ज्या मनुष्याकडे परवाना नसेल, त्या कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करूं नये. जर त्यानें त्यांतून तीन

ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें पिट्रोलियम कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन केलें, तर त्यानें, असें पिट्रोलियम कोणत्या पात्रांमध्यें घातलें पाहिजे याबाबदचे सदहू आक्टाच्या ६ व्या कलमाच्या विशेष ठरावांतील ठराव पाळले पाहिजेत.

---

## नमुना ब.

**भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट ( सन १८८६ चा १२ ) ह्याच्या ५ व्या अगर ६ व्या कलमाअन्वयें द्यावयाचा विशेष परवाना.**

नंबर फी, रुपये

ह्यावरून राहणार ह्यास, सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट, कलम ह्याअन्वयें, एकंदर ग्यालन भयकारक पिट्रोलियम भरलेल्या पेठ्या (किंवा डबे वगैरे, जसें असेल तसें,) ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस व शर्तींस पात्र ठेवून खालीं निर्दिष्ट केलेल्या मार्गानें येथून येथें नेण्यास परवाना दिला आहे: तो मार्ग येणेंप्रमाणें :—

प्रत्येक पेटींत (किंवा डबा वगैरे यांत) पिट्रोलियम किती आहे तें खालीं नमूद केलें आहे :—

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

(सही)

सेक्रेटरी निसबत सरकार.

पिट्रोलियम चाळीस ग्यालनांपेक्षां अधिक नसेल तेव्हां. { अगर कमिशनर किंवा डेप्युटी कमिशनर आफ् पोलीस, मुंबई. अगर रेसिडेंट, एडन. अगर जिल्हा माजिस्ट्रेट.

---

## ब नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू.

[ येथें सदहू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६ आणि १६ ह्या दाखल कराव्या. ]

### शर्ती.

हा परवाना खालील शर्तींस पात्र ठेवून दिला आहे :—

१. सदहू पिट्रोलियम सदहू आक्टाच्या ७ व्या कलमावरहुकूम नांवाच्या चिठ्या मारलेल्या पात्रांमध्यें असलें पाहिजे.

२. सदहू पिट्रोलियम (येथें वाहनाचा प्रकार किंवा वाहनाचे प्रकार दाखल करावे) नेलें पाहिजे.

३. सदहू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां, तें, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या दुसऱ्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकूम करून नेमील तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत व त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

४. सदहू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां, तें ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें जे सामान्य अगर विशेष नियम करितील त्या सर्व नियमांस तें पात्र राहील.

५. सदहू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येत असेल तेव्हां, ती होडी जोंपर्यंत एडन धरून मुंबई इलाक्यांतील कोणत्याही बंदराच्या हद्दींच्या आंत असेल तोंपर्यंत तीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, विस्तव पेटवूं देऊं नये अगर दिवा लावूं देऊं नये. शिवाय, तें पिट्रोलियम ज्या होडींत असेल त्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सर्योदयापासून तों सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा

बावटा लावलेला असला पाहिजे, आणि त्यावर "Petroleum Boat" [पिट्रोलियम बोट] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

६. सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येत असेल तेव्हां, तें पिट्रोलियम नेणारी गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वी चालवूं नये किंवा तिच्यावर दिवा असूं नये.

७. ज्या मनुष्याजवळ सदर्हू आक्टाच्या ९ व्या अगर ६ व्या कलमाखालीं दिलेला परवाना नसेल, अशा कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन ३ ग्यालनपेक्षां जास्त पिट्रोलियम करण्याची हा परवाना धारण करणारास मनाई आहे; किंवा त्यापेक्षां कमी पिट्रोलियम स्वाधीन करणें झाल्यास तें, तें पिट्रोलियम कोणत्या प्रकारच्या पात्रांत ठेविलें पाहिजे याबद्दल सदर्हू आक्टाच्या ६ व्या कलमाच्या विशेष ठरावांत ज्या शर्ती सांगितल्या आहेत त्या पुऱ्या करण्यांत आल्याशिवाय स्वाधीन करूं नये.

---

## नमुना क.

### भयकारक नाहीं असें पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.

नंबर फी, रुपये

ह्यावरून ह्यास भयकारक पिट्रोलियम नाहीं असें ग्यालन पिट्रोलियम खालीं वर्णन केलेल्या जागेंत ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस आणि शर्तीस पात्र ठेवून सांठवण्याचा परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—

(सही)

म्युनिसिपल कमिशनर, मुंबई.

अगर, रेसिडेंट, एडन.

अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

तारीख माहे सन १८९ .

---

## क नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू

[येथें सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२), कलम ११, ह्याअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १ ते ९ ह्या ९, आणि कानू १६, ह्या दाखल कराव्या.]

### शर्ती.

हा परवाना खालील शर्तींस पात्र ठेवून दिला आहे :—

१. हा परवाना ज्या जागेसंबंधानें दिला आहे, त्या जागेंत ज्वालाग्राही पदार्थ मुळींच सांठवूं नयेत.

२. ज्या इमारतींत सदर्हू पिट्रोलियम सांठविलेलें असेल, त्या इमारतीच्या आंत पिट्रोलियम भरलेलें कोणतेंही पात्र उघडूं नये आणि कोणत्याही पात्रांतून तेल काढूं नये.

३. त्या इमारतीच्या आंत कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, विस्तव पेटवूं देऊं नये अगर दिवा लावूं देऊं नये.

४. परवाना देणारा अमलदार जर, हा परवाना ज्या जागेबद्दल दिलेला असेल त्या जागेच्या सुरक्षितपणासाठीं आपल्या मतें जरूर असलेली कोणतीही मरामत करण्यास हा परवाना धारण करणारास लेखी नोटीस देऊन हुकूम करील, तर, तो परवाना धारण करणारानें, ती नोटीस पोंहचण्याच्या तारखेपासून एका

आठवड्याहून कमी नाहीं अशी जी मुदत त्या नोटिशींत नेमली असेल तिच्याआंत ती मरामत केली पाहिजे.

---

### नमुना ड.

भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें कबज्यांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.

नंबर रुपये

ह्यावरून ह्यास, ग्यालन पिट्रोलियम खालीं वर्णन केलेल्या जागेंत, ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस आणि शर्तींस पात्र ठेवून सांठवण्याकरितां परवाना दिला आहे.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—

म्युनिसिपल कमिशनर, मुंबई.
अगर रेसिडेंट, एडन.
अगर जिल्हा माजिस्ट्रेट.

तारीख माहे सन १८९ .

---

### ड नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

#### कानू.

[ येथें सदहू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १ ते ९ ह्या ९, व कानू १६, ह्या दाखल कराव्या. ]

#### शर्ती.

[ येथें ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ३ अ ह्या कानूबरहुकूम स्थानिक सरकारानें ह्लान व स्पेसिफिकेशन्सबद्दल ज्या शर्ती ठरविलेल्या असतील त्या दाखल कराव्या ].

---

### नमुना ई.

भयकारक नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा विशेष परवाना.

नंबर फी, रुपये

ह्यावरून ह्यास येथ्या मिळून * ग्यालन पिट्रोलियम येथून येथें, ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंसं आणि शर्तींस पात्र ठेवून नेण्याचा परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत अमलांत राहील.

तारीख माहे सन १८९ .

कमिशनर अगर डेप्युटी कमिशनर आफ् पोलीस, मुंबई.
अगर रेसिडेंट एडन.
अगर जिल्हा माजिस्ट्रेट.

* पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेतून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां हे शब्द गाळावे.

## ई नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू.

[ येथें, सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६ आणि १६ ह्या दाखल कराव्या.]

### शर्ती.

हा परवाना खालीं दिलेल्या शर्तीस पात्र ठेवून दिला आहे:—

### सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां.

१. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकूम करून नेमील तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत व त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

### सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

२. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडींत कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, विस्तव पेटवूं देऊं नये, अगर दिवा लावूं देऊं नये.

३. शिवाय, तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून तों सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लाविलेला असला पाहिजे आणि त्यावर "Petroleum Boat" [ पिट्रोलियम बोट ] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिले असले पाहिजेत.

### सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

४. तें पिट्रोलियम नेणाऱ्या गाड्या सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वीं चालवूं नयेत, किंवा त्यांच्यावर दिवा असूं नये.

### सदर्हू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.

५. तें पिट्रोलियम ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें जे सामान्य अगर विशेष नियम ठरवितील त्या सर्व नियमांस तें पात्र राहील.

६. हा परवाना मोठ्या प्रमाणाच्या पिट्रोलियमबद्दल दिलेला असेल तेव्हां, सदर्हू तेल ज्या आगबोटीनें, मचव्यानें, गाडीनें अगर रेलवे वागणीनें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल अगर रेलवे वागणीबद्दल कलम ११ अन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ व्या कानूंत ठराव असल्याप्रमाणें योग्य रीतीचा दाखला असला पाहिजे. मोठ्या प्रमाणाचें नाहीं अशा पिट्रोलियम-बद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें, हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर सहज फुटणार नाहींत अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें असलें पाहिजे अगर चांगल्या रीतीनें बूच मारिलेल्या आणि फुटण्याची भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

### साधारण शर्त.

७. हा परवाना त्यावर निर्दिष्ट केलेल्या मार्गासंबंधानें मात्र कायदेशीर समजला जाईल, आणि तो, तें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्याजागीं नेण्याच्या कामीं ज्या कोणत्याही रेलवेचा अगर वाहून नेण्याचें काम करणाऱ्या ज्या इतर मंडळीचा अगर मनुष्याचा उपयोग केलेला असेल, तिजकडे अगर त्याकडे हजर केला पाहिजे; आणि ज्या मुदतीपर्यंत तो कायदेशीर असेल ती मुदत संपतांच तो, परवाना देणाऱ्या अधि-काऱ्याकडे परत दिला पाहिजे.

## नमुना फ.

भयकारक नाहीं असें पिट्रोलियम गाडीनें (अगर मोठ्या प्रमाणानें, जसें असेल तसें,) एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२), कलम १०, ह्याअन्वयें द्यावयाचा साधारण परवाना.

कानू ६ (अ) पाहा.

नंबर

फी, रुपये १००.

ह्यावरून ह्यास भयकारक नाहीं असें पिट्रोलियम (गाडीनें अगर मोठ्या प्रमाणानें, जसें असेल तसें,* ) ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानू व शर्ती ह्यांस पात्र ठेवून, मुंबई इलाक्याच्याआंत एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यास साधारण परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत अमलांत राहील.

तारीख माहे सन १८९ . { कमिशनर अगर डेप्युटी कमिशनर आफ् पोलीस, मुंबई.<br>अगर रेसिडेंट, एडन.<br>अगर जिल्हा माजिस्ट्रेट. }

* पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, तेव्हां तें कोणत्या रीतीनें न्यावयाचें तें निर्दिष्ट करावें.

---

### फ नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### कानू.

[येथें सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६ आणि १६ ह्या दाखल कराव्या.]

### शर्ती.

#### सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां.

१. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकूम करून नेमील तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत व त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

#### सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

२. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडींत कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, विस्तव पेटवूं देऊं नये, अगर दिवा लावूं देऊं नये.

३. तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून तों सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लावलेला असला पाहिजे, आणि त्यावर "Petroleum Boat" [पिट्रोलियम बोट] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

#### सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

४. तें पिट्रोलियम नेणारी गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वीं चालवूं नये, अगर तिच्यावर कोणताही दिवा असूं नये.

#### सदर्हू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.

५. तें पिट्रोलियम ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें जे सामान्य अगर विशेष नियम ठरवितील त्या सर्व नियमांस तें पात्र राहील.

६. सदरहू परवान्याचा नंबर, गाडीवरील शेवटल्या पेटीच्या सहज दिसणाऱ्या भागावर अगर सहज दिसे अशा दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें सुवाच्य मांडिला पाहिजे.

### साधारण शर्त.

७. हा परवाना मोठ्या प्रमाणाच्या पिट्रोलियमबद्दल देण्यांत आला असेल तेव्हां, तें तेल ज्या आगबोटींतून, मचव्यांतून, गाडींतून अगर रेलवे वागणींतून एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल, अगर रेलवे वागणीबद्दल, ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ व्या कानूंत ठराव असल्याप्रमाणें योग्य रीतीचा दाखला असला पाहिजे.

मोठ्या प्रमाणाचें नाहीं अशा पिट्रोलियमबद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें, हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर सहज न फुटणाऱ्या इतर पात्रांमध्यें भरलेलें असलें पाहिजे, अगर चांगल्या रीतीनें बूच मारलेल्या व फुटण्याची भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

---

## नमुना ग.

### भयकारक पिट्रोलियम नाहीं असें पिट्रोलियम गाडीनें (अगर मोठ्या प्रमाणानें, असें असेल तसें) एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल साधारण परवाना नंबर हा धारण करणारानें द्यावयाचा पास.

नंबर

खरोखर झाचा माल असणारें पेट्या मिळून* ग्यालन पिट्रोलियम

येथून येथें नेण्यांत येईपर्यंत त्याबद्दल हा पास चालेल.

तारीख माहे सन १८९ .

साधारण परवाना नंबर धारण करणारा.

---

### ग नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

### सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां.

१. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकुम करून नेमील तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत व त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

### सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

२. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडींत कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, विस्तव पेटवूं देऊं नये अगर दिवा लावूं देऊं नये. तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून तों सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लावलेला असला पाहिजे, आणि त्यावर "Petroleum Boat" [पिट्रोलियम बोट] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

### सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

३. तें पिट्रोलियम नेणाऱ्या गाड्या सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वीं चालवूं नयेत, अगर तिच्यावर कोणताही दिवा असूं नये.

### सदर्हू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.

४. तें पिट्रोलियम ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें जे सामान्य अगर विशेष नियम ठरवितील, त्या सर्व नियमांस तें पात्र राहील.

*पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां " पेट्या मिळून" हे शब्द गाळावे.

## साधारण शर्ती.

१. हें पिट्रोलियम ज्या साधारण परवान्याबरहुकुम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत येत असेल, त्या साधारण परवान्याचा नंबर, गाडीवरील शेवटच्या पेटीच्या सहज दिसणाऱ्या भागावर, अगर सहज दिसे अशा दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें सुवाच्य मांडिला पाहिजे.

६. हा परवाना मोठ्या प्रमाणाच्या पिट्रोलियमबद्दल देण्यांत आला असेल तेव्हां, तें तेल ज्या आगबोटींतून, मचव्यांतून, गाडींतून अगर रेलवे वागणींतून एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल अगर रेलवे वागणीबद्दल, ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ व्या कानूंत ठराव असल्याप्रमाणें योग्य दाखला असला पाहिजे. मोठ्या प्रमाणाचें नाहीं अशा पिट्रोलियमाबद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर सहज न फुटणाऱ्या इतर पात्रांमध्यें भरलेलें असलें पाहिजे, अगर चांगल्या रीतीनें बूच मारलेल्या व फुटण्याची भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

आलिजाह् नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. डब्ल्यू. पी म्यूर-म्याकन्झी,

आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.